# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## विद्यार्थी विकास विभाग

# वार्षिक अहवाल

## (२०२२-२०२३)

## आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, शिरपूर


**डॉ. विनोद उगले**
विद्यार्थी विकास अधिकारी

**डॉ. अतुल अ. शिरखेडकर**
उप-प्राचार्य

**डॉ. संजय ज. सुराणा**
प्राचार्य

**प्रा. आमोद पाटील**
सहा. विद्यार्थी विकास अधिकारी

**प्रा. स्नेहल भावसार**
सहा. म. विद्यार्थी विकास अधिकारी

## आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, शिरपूर

## विद्यार्थी विकास विभाग वार्षिक अहवाल (२०२२-२०२३)

| अ.क्र. | उपक्रम | दिनांक | स्थळ | सहभाग संख्या | लाभार्थी संख्या | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **जागतिक आदिवासी दिन** | ०९ ऑगस्ट २०२२ | आर. सी. पटेल औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर | १२० | १२० | स्वयं अर्थसंहाय्यीत |
| २ | **महामार्ग वाहतूक सुरक्षा** | १० ऑगस्ट २०२२ | आर. सी. पटेल औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर | २१२ | २१२ | स्वयं अर्थसंहाय्यीत |
| ४ | **स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव विविध उपक्रम (उत्तर महाराष्ट्र विदयापीठ नामविस्तार दिन आणि वर्धपान दिन, रांगोळी, निबंध, चित्रलेखन सामूहिक राष्ट्रगीत गायन)** | १० ऑगस्ट ते १७ ऑगस्ट २०२२ | आर. सी. पटेल औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर | २२० | २२० | स्वयं अर्थसंहाय्यीत |
| ५ | **मॅरेथॉन स्पर्धा** | २९ ऑगस्ट २०२२ | आर. सी. पटेल औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर | ३५० | ३५० | १०,०००/- (कबचौउमवि) |
| ६ | **काव्यवाचन स्पर्धा** | २८ सप्टेंबर २०२२ | एसपीडीएम महाविद्यालय, शिरपूर | ०२ | ०२ | स्वयं अर्थसंहाय्यीत |
| ७ | **आदिवासी विद्यार्थी संमेलन व पोस्टर सादरीकरण स्पर्धा** | ८ ऑक्टोबर २०२२ | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | ०४ | ०४ | कबचौउमवि |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | **वाचन प्रेरणा दिन** | १५ ऑक्टोबर २०२२ | आर. सी. पटेल औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर | १२० | १२० | स्वयं अर्थसंहाय्यीत |
| ९ | **स्वतंत्र आणि सशक्त भारताच्या पायाभरणीत शास्त्रज्ञांचे योगदान या विषयावर व्याख्यान** | १२ नोव्हेंबर २०२२ | आर. सी. पटेल औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर | १२० | १२० | ५,०००/- (कबचौउमवि) |
| १० | **राष्ट्रीय एच. आय. व्ही. नियंत्रण प्रश्नमंजुषा स्पर्धा** | १५ नोव्हेंबर २०२२ | राष्ट्रीय एड्स नियंत्रण विभाग, जिल्हा रुग्णालय, धुले | ०२ | ०२ | जिल्हा रुग्णालय, धुले |
| ११ | **एड्स दिना निमित्त रांगोळी स्पर्धा संपन्न** | १५ डिसेंबर २०२२ | आर. सी. पटेल औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर | २० | २० | ५,०००/- (महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबई) |
| १२ | **कमवा आणि शिका योजना** | २०२२ - २३ | आर. सी. पटेल औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर | २५ | २५ | ४,४०,०००/- (कबचौउमवि) |
| १३ | **मतदार जागृती अभियान** | २५ जानेवारी २०२३ | आर. सी. पटेल औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर | १३२ | १३२ | शिरपूर तहसील कार्यालय, शिरपूर |
| १४ | **शिक्षणाचे महत्त्व यावर एक दिवसीय कार्यशाळा** | ४ फेब्रुवारी २०२३ | आर. सी. पटेल औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर | १०४ | १०४ | २०,११०/- (कबचौउमवि) |
| १५ | **आंतराष्ट्रीय योग दिवस** | २१ जून २०२३ | आर. सी. पटेल औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर | ३०० | ३०० | स्वयं अर्थसंहाय्यीत |

| उपक्रम १. | जागतिक आदिवासी दिन |
|---|---|

दि. ०९.०८.२०२२ रोजी आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालयात जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम घेण्यात आला. त्यानिमित्त 'क्रांतीवीर ख्वाजा नाईक' आणि 'महामानव बिरसा मुंडा' यांचे प्रतिमा पूजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सुराणा यांनी प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. याप्रसंगी उप-प्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर यांनी आदिवासी दिनाचे महत्त्व विशारद केले.

संयुक्त राष्ट्रसंघासमोर एकबाब समोर आली ती अतिशय धक्कादायक होती. ती बाब म्हणजे जगातील अनेक मूळनिवासी समुहांनी निसर्ग जपण्याचे मोलाचे कार्य केले. परंतु आधुनिक समाजाच्या मुख्यप्रवाहात येऊ न शकल्यामुळे या आदिमजमाती शिक्षण, आरोग्य, रोजगार व इतर अनेक सोयी सुविधापासून वंचीत राहिले आहेत. या गोष्टींचे गांभीर्य लक्षात घेऊन संयुक्तराष्ट्रसंघाने ०९ ऑगस्ट १९९४ यादिवशी 'जागतिक आदिवासी दिवस' घोषित केला. यादिवशी जगभरात आदिवासी बांधव एकत्र येऊन आपापल्या संस्कृतीप्रमाणे वेशभूषा, गायन, नृत्य करून हा दिवस साजरा करतात. मानवाची जसजशी उत्क्रांती होत गेली तसतसा मानव पृथ्वीवर निरनिराळ्या खंडापर्यंत प्रवास करू लागला. तेथील वातावरणाशी त्याने जुळवून घेतले. हळूहळू शब्द, बोली आणि पुढे भाषा, संवाद अशी उत्क्रांती होत गेली. आजही जगाच्या कानाकोपऱ्यात अनेक आदिमजमाती आपली बोलीभाषा, रुढीपरंपरा जपत निसर्गाच्या सानिध्यात राहत आहेत.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जे. सुराणा, उपप्राचार्य डॉ.ए.ए. शिरखेडकर, आर.सी.पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी प्राचार्य डॉ. नितीन हसवानी विद्यार्थी विकास अधिकारी डॉ विनोद उगले,राष्ट्रीय सेवायोजना कार्यक्रम अधिकारी डॉ.मनोज गिरासे ,प्रा अमोल अहिरे, प्रा. युवराज पावरा, प्रा. राहुल पावरा, रजिस्ट्रार जितेश जाधव, जी. जी. पावरा आणि प्रकाश पावरा आदी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि प्राध्यापकेतर

बंधूभगिनी तसेच राष्ट्रीय सेवायोजनेचे स्वयंसेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीकरण्यासाठी विद्यार्थी विकास अधिकारी आणि राष्ट्रीय सेवायोजनेचे कार्यक्रमाधिकारी व इतर स्वयंसेवकांनी प्रयत्न केले.



# आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालयात जागतिक आदिवासी दिन साजरा

शिरपूर/प्रतिनिधी–

आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालयात जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला.

महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम घेण्यात आला. त्यानिमित्त 'क्रांतीवीर ख्वाजा नाईक' आणि 'महामानव बिरसा मुंडा' यांचे प्रतिमा पूजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सुराणा यांनी प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. याप्रसंगी उप–प्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर यांनी आदिवासी दिनाचे महत्त्व विशद केले.कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जे. सुराणा, उपप्राचार्य डॉ. ए.ए. शिरखेडकर, आर. सी. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी प्राचार्य डॉ. नितीन हासवानी, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ विनोद उगले, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मनोज गिरासे, प्रा. अमोल अहिरे, प्रा. युवराज पावरा, प्रा. राहुल पावरा, रजिस्ट्रार जितेश जाधव, जी. जी. पावरा, प्रकाश पावरा उपस्थित होते.

| उपक्रम २. | 'महामार्ग वाहतूक सुरक्षा' विषयावर मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिक |
|---|---|

आजकाल तरुण मुले वेगाने वाहन चालवून रहदारी नियमांचे पालन करीत नाही, त्यामुळे रस्ते अपघात वाढत आहेत. हे अत्यंत चिंताजनक आहे. यासाठी रस्ते सुरक्षेविषयी लोकांना जागरूक करून त्यांना वाहतुकीच्या नियमांचा धडा शिकवण्याची नितांत गरज आहे. अपघातामध्ये एखाद्या व्यक्तीला बर्याच वेळा आपला जीव गमवावा लागतो किंवा अपंगत्व झाल्याने त्याचा त्रास आयुष्यभर सहन करावा लागतो. गेल्या काही वर्षांत, वेग आणि रस्ता सुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष केल्यामुळे रस्ते अपघातांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे, जी चिंताजनक आहे. म्हणूनच 'आझादी का अमृतमहोत्सव' अंतर्गत शिरपूर येथील आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालयात महाविद्यलयीन तरुणांमध्ये याबद्दल जागृती व्हावी या उद्देशाने विद्यार्थी विकास विभाग तर्फे'महामार्ग वाहतूक सुरक्षा' विषयावर मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. यासाठी प्रमुख अतिथी आणि मार्गदर्शक श्री हेमंतकुमार भामरे (पोलीस निरीक्षक महामार्ग पोलीस) श्री नरेंद्र पवार (सहाय्यक पोलीस निरीक्षक, शिरपूर), श्री मुस्तफा मिर्झा (सहाय्यक पोलीस निरीक्षक, शिरपूर) आणि सहकारी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जे. सुराणा, उपप्राचार्य डॉ ए.ए. शिरखेडकर, आर सी पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी प्राचार्य डॉ. नितीन हसवानी, महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विनोद उगले आणि प्राध्यापक वृंद उपस्थित होते.

श्री. हेमंतकुमार भामरे (पोलीस निरीक्षक महामार्ग पोलीस) यांनी अपघातांना आळा घालण्यासाठी आपण काय करू शकतो यावर मार्गदर्शन केले; सर्वांनी एकत्रित येऊन लोकांना रस्ता सुरक्षेविषयी जागरूक करण्याची गरज आहे आणि या दिशेनेच हा प्रयत्न असल्याचे स्पष्ट केले. रस्ता सुरक्षेसंदर्भात प्रतिबंधात्मक उपाययोजना अवलंबल्यास रस्ते अपघात कमी होऊ शकतात. जसे सीट बेल्ट घालणे, वाहन चालविताना फोनवर बोलणे टाळावे, हेल्मेट चा वापर, रहदारीच्या नियमांचे पालन, वाहनाचा वेग नियंत्रित, मद्यपान करू वाहन चालवू नका, प्रवासादरम्यान सिगारेट किंवा कोणत्याही प्रकारचा मादक पदार्थ वापरू नका, कधीही चुकीच्या दिशेने जाऊ नका

किंवा दुचाकी स्वरांनी महामार्गावर लक्षपूर्वक कमी वेगात डाव्या बाजूने चालावे आदी खबरदारी घेतल्यास अपघात टाळून जीवितहानी देखील होणार नाही, असे सांगितले.

श्री मुस्तफा मिर्झा (सहाय्यक पोलीस निरीक्षक, शिरपूर) यांनी महामार्ग सुरक्षा पथक याबद्दल माहिती दिली तसेच त्यासंबंधी कायदे यावर प्रकाश टाकला. त्यांनी ब्रीद स्क्रिनिंग उपकरण, वाहनावरील ब्लॅक फिल्म इंडिकेटर याबद्दल माहिती दिली तसेच रात्रीच्यावेळी रिफ्लेक्टिव्ह टी शर्ट चा वापर करावा धावपटू किंवा पायी चालणाऱ्यांचा अपघात टाळता येईल.

श्री नरेंद्र पवार (सहाय्यक पोलीस निरीक्षक, शिरपूर) यांनी हर घर तिरंगा या मोहिमेत सहभागी व्हा, परंतु त्यानंतर आपल्या राष्ट्रध्वजाचा अपमान होवू नये याची दक्षता घ्या. तसेच रस्त्यावर वाहनांचा वेग कमी ठेवून आपल्या मुळे अपघात होणार नाही याची दक्षता घ्यावी.तरुणांनी वाहतूक नियमांचे पालन करून जागरूक नागरिक म्हणून आपले योगदान द्यावे असे आव्हान केले.

त्यानंतर त्यांनी सहकारी कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने महामार्गावरील वेग मर्यादा कश्याप्रकारे कार्यरत आहे हे प्रात्यक्षिकाद्वारे विदयार्थ्यांना दाखविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन प्रा स्नेहल भावसार यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनास रजिस्ट्रार जितेश जाधव यांचे सहकार्य लाभले.




GPS Map Camera
Shirpur, Maharashtra, India
Shop No 1 Karwand Naka, near Pharmacy Collage, Mandal, Shirpur,
Maharashtra 425405, India
Lat 21.355557°
Long 74.894128°
10/08/22 12:46 PM
Google





लोकमत

# 'वाहतूक सुरक्षा' विषयावर मार्गदर्शन

शिरपूर : आर.सी.पटेल फार्मसी महाविद्यालयात महामार्ग वाहतूक सुरक्षा विषयावर मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.यावेळी महामार्ग पोलीस निरीक्षक हेमंतकुमार भामरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नरेंद्र पवार, मुस्तफा मिर्झा, प्राचार्य डॉ. एस. जे.सुराणा, उपप्राचार्य डॉ. ए. ए.शिरखेडकर, प्राचार्य डॉ.नितीन हासवानी, डॉ.विनोद उगले उपस्थित होते.पोलीस निरीक्षक हेमंतकुमार भामरे यांनी अपघातांना आळा घालण्यासाठी आपण काय करू शकतो यावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. स्नेहल भावसार यांनी केले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Hello Dhule
Page No. 3 Aug 18, 2022
Powered by: erelego.com

| उपक्रम ३. | स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव दि. १० ऑगस्ट ते १७ ऑगस्ट २०२२ |
|---|---|

आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभागतर्फे **दि. ११ ऑगस्ट २०२२** रोजी आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यलयात **उत्तर महाराष्ट्र विदयापीठ नामविस्तार दिन** आणि **वर्धपान दिन** साजरा करण्यात आला.

उत्तर महाराष्ट्र विदयापीठ नामविस्तार दिन आणि वर्धपान दिन निमित्त कवियत्री बहिणाबाई चौधरी यांचे **प्रतिमा पूजन** करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जे. सुराणा, उपप्राचार्य डॉ. ए. ए. शिरखेडकर, आर. सी. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी प्राचार्य डॉ. नितीन हसवानी, महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विनोद उगले आणि प्राध्यापक वृंद उपस्थित होते. तसेच दुपारच्या सत्रात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव'निमित्त रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्त्रीमुक्ती, आझादी का अमृतमहोत्सव, आत्मनिर्भर भारत याविषयानुरूप **रांगोळी स्पर्धा** घेण्यात आली.

**दि. १२ ऑगस्ट २०२२** रोजी 'कवियत्री बहिणाबाई चौधरी यांचे जीवन चरित्र' याविषयावर **निबंधलेखन स्पर्धा** आयोजित करण्यात आली होती. तसेच स्त्रीमुक्ती, आझादी का अमृतमहोत्सव, आत्मनिर्भर भारत याविषयावर चित्रकला स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली होती या सर्वस्पर्धांना विद्यार्थ्यांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभला.

**दि. १५ ऑगस्ट स्वातंत्र दिनी** मा. श्रीमती स्मितीबेन पटेल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रसंगी शिरपूर एजुकेशन सोसायटी मधील सर्वमहाविद्यलयाचे प्राचार्य उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, नृत्य आणि नाटक सादर केले.

९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट २०२२ दरम्यान दररोज **सामूहिक राष्ट्रीयगीत गायन** करण्यात आले. प्राचार्य, उप्राचार्य, सर्वप्राध्यापक, प्राध्यपकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या उपस्थित राष्ट्रगीत गायन करण्यात आले.

**दि. ११ ऑगस्ट २०२२;** उत्तर महाराष्ट्र विदयापीठ नामविस्तार दिन आणि वर्धपान दिन




**दि. १२ ऑगस्ट २०२२;** स्त्रीमुक्ती, आझादी का अमृतमहोत्सव, आत्मनिर्भर भारत याविषयावर **चित्रकला स्पर्धा**



**दि. १३ ऑगस्ट २०२२**: सामूहिक राष्ट्रगीत गायन




जळगाव **तरुण भारत** २१.८.२०२२

# आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालयात उमवि नामविस्तार दिन, वर्धापनदिन साजरा




**शिरपूर :** आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यलयात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ नामविस्तार दिन आणि वर्धापन दिन तसेच स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त विविध उपक्रम १० ते १७ ऑगस्ट दरम्यान उत्साहात साजरा झाला.

महामार्ग वाहतूक सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.


मार्गदर्शक महामार्गाचे पोलीस निरीक्षक हेमंतकुमार भामरे, शिरपूरचे सपोनि नरेंद्र पवार, सपोनि मुस्तफा मिर्झा व सहकाऱ्यांनी अपघातांना आळा घालण्याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थी विकास विभागातर्फे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ नामविस्तार आणि वर्धापन दिन साजरा झाला. यानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे प्रतिमा पूजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. एस. जे. सुराणा, उपप्राचार्य डॉ ए.ए. शिरखेडकर, आर. सी. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी प्राचार्य डॉ. नितीन हसवानी, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विनोद उगले उपस्थित होते. दुपारच्या सत्रात रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. स्त्री मुक्ती, आझादी का अमृतमहोत्सव, आत्मनिर्भर भारत या विषयानुरूप रांगोळी स्पर्धा घेण्यात आली कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे जीवनचरित्र या विषयावर निबंध लेखन स्पर्धा झाली. स्त्री मुक्ती, आझादी का अमृतमहोत्सव, आत्मनिर्भर भारत या विषयावर चित्रकला स्पर्धादेखील झाली. स्वातंत्र्य दिनी शिरपूर एज्युकेशन सोसायटी ट्रस्टी कृतीबेन भूपेशभाई पटेल यांनी ध्वजारोहण केले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, नृत्य, नाटक सादर केले.


सर्व उपक्रम यशस्वीतेसाठी विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विनोद उगले, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. आमोद पाटील, महिला विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. स्नेहल भावसार, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मनोज गिरासे, महिला राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. हेमाक्षी चौधरी, रजिस्ट्रार जितेश जाधव यांनी संयोजन केले.

| उपक्रम ४. | 'मॅरेथॉन स्पर्धा' |
|---|---|

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ चे विद्यार्थी विकास विभाग आणि महाविद्यालयतील विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष' व 'राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त' दि. २९ ऑगस्ट, २०२२ रोजी सकाळी ७.०० वाजता 'भव्य मॅरेथॉनचे' आयोजन करण्यात आलेले होते. ही मॅरेथॉन मुले व मुली गट अशा दोन गटात आयोजित करण्यात आली होती. या मॅरेथॉनचे उदघाटन उपप्राचार्य डॉ अतुल शिरखेडकर, विद्यार्थी विकास विभाग अधिकारी डॉ. विनोद उगले, राष्ट्रीय सेवा योजना डॉ. मनोज गिरासे, क्रीडा विभाग प्रमुख सचिन अहिरे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ अतुल शिरखेडकर, आर सी पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ. नितीन हसवानी उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ अतुल शिरखेडकर म्हणाले की, 'सर्वांनी रोज चाललं पाहिजे, व्यायाम केला पाहिजे त्याच्याने मानसिक व शारीरिक स्वास्थ उत्तम राहते. या उदघाटन समारंभाचे सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विनोद उगले यांनी केले तर आभार डॉ. मनोज गिरासे यांनी मानले. या मॅरेथॉनमध्ये ३५० हून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते. या मॅरेथॉन मध्ये सहभागी झालेल्या ७५ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. याप्रसंगी मॅरेथॉनमधील विजेत्या प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या मॅरेथॉन मध्ये पुरुष गटातून देवेंद्र मधुकर पाटील -प्रथम क्रमांक, राकेश संजय आमले -द्वितीय क्रमांक, राहुल गुणवंत शिंदे -तृतीय क्रमांकावर पारितोषिके प्राप्त केली. महिला गटातून पायल अनार जाधव -प्रथम क्रमांक धनश्री रवींद्रसिंह राजपूत -द्वितीय क्रमांक, स्वाती शाहूराज प्रताळे -तृतीय क्रमांकावर पारितोषिके मिळविली. स्पर्धेतील विद्यार्थीसाठी चाय व बिस्किटे दिले. स्पर्धेच्या वेळी पोलिस बंदोबस्त करण्यात आला होता.


GPS Map Camera
Kalmasare, Maharashtra, India
MH SH 4, Kalmasare, Maharashtra 425405, India
Lat 21.345803°
Long 74.914903°
29/08/22 07:58 AM
Google


GPS Map Camera
Kalmasare, Maharashtra, India
8WX3+WJ8 Shirpur Bridge, MH SH 4, Hulesighnana Nagar, Kalmasare, Maharashtra 425405, India
Lat 21.349521°
Long 74.904977°
29/08/22 07:43 AM
Google


GPS Map Camera
Shirpur, Maharashtra, India
44/45, Padmavati nagar, Mandal, Shirpur, Maharashtra 425405, India
Lat 21.355194°
Long 74.893146°
29/08/22 07:36 AM
Google


Pharmaceutical Education & Research
GPS Map Camera
Shirpur, Maharashtra, India
Shop No 1 Karwand Naka, near Pharmacy Collage, Mandal, Shirpur, Maharashtra 425405, India
Lat 21.355502°
Long 74.894024°
29/08/22 08:58 AM
Google

# आर.सी.पटेल फार्मसी महाविद्यालयातील मॅरेथॉनमध्ये साडेतीनशेवर स्पर्धक सहभागी



। खान्देश मैदान न्यूज ।

● शिरपूर : आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालयात मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात झाली. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे विद्यार्थी विकास विभाग आणि महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष व राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त २९ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ७ वाजता भव्य मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले. ही मॅरेथॉन मुले व मुली गट अशा दोन गटात आयोजित करण्यात आली. या मॅरेथॉनचे उदघाटन उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर, विद्यार्थी विकास विभाग अधिकारी डॉ. विनोद उगले, राष्ट्रीय सेवा योजना डॉ. मनोज गिरासे, क्रीडा विभाग प्रमुख सचिन अहिरे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर, आर. सी. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. नितीन हसवानी उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात उपप्राचार्य डॉ.अतुल शिरखेडकर म्हणाले, सर्वांनी रोज चाललं पाहिजे, व्यायाम केला पाहिजे. त्याच्याने मानसिक व शारीरिक स्वास्थ उत्तम राहते. सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विनोद उगले यांनी केले. आभार डॉ. मनोज गिरासे यांनी मानले. या मॅरेथॉनमध्ये ३५० हून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते. या मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या ७५ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. याप्रसंगी मॅरेथॉनमधील विजेत्या प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. पुरुष गटात देवेंद्र मधुकर पाटील प्रथम क्रमांक, राकेश संजय आमले –द्वितीय, राहुल गुणवंत शिंदे तृतीय क्रमांकावर पारितोषिके प्राप्त केली. महिला गटातून पायल अनार जाधव –प्रथम, धनश्री रवींद्रसिंह राजपूत –द्वितीय, स्वाती शाहूराज प्रताळे तृतीय पारितोषिके मिळविली. स्पर्धेतील विद्यार्थ्यांना चहा व बिस्किटे दिले. स्पर्धेच्या वेळी पोलिस बंदोबस्त होता. प्रा. कमलेश माळी, मेघनाथ शेटे, विलास जगताप, सोपान कुंभार, नितीन माळी, डॉ. निलेश कुलकर्णी, प्रतीक्षा मेश्राम, सोनाली शंभरकर आदींचे सहकार्य लाभले.

आपला महाराष्ट्र
₹२.०० संस्थापक - लोकमित्र भाई मदाने www.aplamaharashtra.in
संयुक्त वर्ष ६५ ■ अंक क्र.३२५ ■ शुक्रवार २ सप्टेंबर २०२२ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४



# पटेल फार्मसी महाविद्यालयात मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात संपन्न

**शिरपूर, दि.१– आर.सी. पटेल फार्मसी महाविद्यालयात मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे विद्यार्थी विकास विभाग आणि महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष व राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त भव्य मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले.**

ही मॅरेथॉन मुले व मुली गट अशा दोन गटात आयोजित करण्यात आली. या मॅरेथॉनचे उदघाटन उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर, विद्यार्थी विकास विभाग अधिकारी डॉ.विनोद उगले, राष्ट्रीय सेवा योजना डॉ. मनोज गिरासे, क्रीडा विभाग प्रमुख सचिन अहिरे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ.अतुल शिरखेडकर, आर.सी. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.नितीन हसवानी उपस्थित होते. या मॅरेथॉनमध्ये ३५० हून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते. सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. याप्रसंगी विजेत्या प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. पुरुष गटात देवेंद्र मधुकर पाटील प्रथम क्रमांक, राकेश संजय आमले द्वितीय, राहुल गुणवंत शिंदे तृतीय क्रमांकावर पारितोषिके प्राप्त केली. महिला गटातून पायल अनार जाधव प्रथम, धनश्री रवींद्रसिंह राजपूत द्वितीय, स्वाती शाहूराज प्रताळे तृतीय पारितोषिके मिळविली.

देशोन्नती

# आर.सी.पटेल फार्मसी महाविद्यालयात मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अन् क्रीडा दिनानिमित्त करण्यात आले होते आयोजन

देशोन्नती वृत्तसंकलन...



**शिरपूर** ▪ आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालयात मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात संपन्न झाली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे विद्यार्थी विकास विभाग आणि महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष व राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले.

ही मॅरेथॉन मुले व मुली गट अशा दोन गटात आयोजित करण्यात आली. या मॅरेथॉनचे उदघाटन उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर, विद्यार्थी विकास विभाग अधिकारी डॉ. विनोद उगले, राष्ट्रीय सेवा योजना डॉ. मनोज गिरासे, क्रीडा विभाग प्रमुख सचिन अहिरे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर, आर. सी. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. नितीन हसवानी उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात उपप्राचार्य डॉ.अतुल शिरखेडकर म्हणाले, सर्वांनी रोज चाललं पाहिजे, व्यायाम केला पाहिजे त्याच्याने मानसिक व शारीरिक स्वास्थ उत्तम राहते. सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विनोद उगले यांनी केले. आभार डॉ. मनोज गिरासे यांनी मानले.

या मॅरेथॉनमध्ये ३५० हून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते. या मॅरेथॉन मध्ये सहभागी झालेल्या ७५ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. याप्रसंगी मॅरेथॉन मधील विजेत्या प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. पुरुष गटात देवेंद्र मधुकर पाटील प्रथम क्रमांक, राकेश संजय आमले -द्वितीय, राहुल गुणवंत शिंदे तृतीय क्रमांकावर पारितोषिके प्राप्त केली. महिला गटातून पायल अनार जाधव -प्रथम, धनश्री रवींद्रसिंह राजपूत -द्वितीय, स्वाती शाहूराज प्रताळे तृतीय पारितोषिके मिळविली.

Deshonnati Edition
Sep 3, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

| उपक्रम ५. | 'काव्यवाचन स्पर्धा' |
|---|---|

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व विद्यार्थी विकास विभाग श्रीमती पार्वतीबाई दलपत माळी कला, श्री बंडू भगवान व श्रीमती हिराबाई दलाल वाणिज्य व शिरपूर मर्चंट असोसिएशन विज्ञान महाविद्यालय शिरपूर, यांच्या संयुक्त विद्यमाने स्वांतत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त काव्यवाचन स्पर्धा दि.२८ सप्टें. २०२२ आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत आर सी पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासिटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, शिरपूर विद्यालयातील विद्यार्थी शुभम विलास देवरे याने तृतीय क्रमांक प्राप्त केला. त्यास विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विनोद उगले यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ. एस. जे. सुराणा आणि उप प्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर यांनी कौतुक केले.



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व विद्यार्थी विकास विभाग श्रीमती पार्वतीबाई दलपत माळी कला, श्री बंडू भगवान व श्रीमती हिराबाई दलाल वाणिज्य व शिरपूर मर्चंट असोसिएशन विज्ञान महाविद्यालय शिरपूर, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

**स्वांतत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त काव्यवाचन स्पर्धा दि.२८ सप्टें.२०२२**

Azadi Ka Amrit Mahotsav

# प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, शुभम विलास देवरे यांनी एसपीडीएम महाविद्यालय, शिरपूर येथे आयोजित स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त काव्यवाचन स्पर्धेत सहभाग घेऊन ~~प्रथम~~/~~व्दितीय~~/तृतीय क्रमांक प्राप्त केला. त्या निमित्ताने प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| डॉ.एस.बी.चौधरी | डॉ.फुला बागुल | डॉ.एस.एस.राजपूत |
| **वि.वि.अधिकारी** | **समन्वयक** | **प्राचार्य** |

S.P.D.M. Arts, S.B.B. & S.H.D. Com. & S.M.A. Sci. College * SHIRPUR Dist Dhule 425 405

| उपक्रम ६. | 'स्वातंत्र्यता संग्रामात आदिवासी नायकांचे योगदान' या विषयावर आदिवासी विद्यार्थी संमेलन व पोस्टर सादरीकरण स्पर्धा' |
|---|---|

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील राष्ट्रीय पोस्टर सादरीकरण**

**दि ८ ऑक्टोबर २०२२** राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग नवी दिल्ली व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने स्वातंत्र्यता संग्रामात आदिवासी नायकांचे योगदान या विषयावर आदिवासी विद्यार्थी संमेलन व पोस्टर सादरीकरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. व्ही. एल. माहेश्वरी (माननीय कुलगुरू कबचौ, जळगाव), प्रमुख अतिथी डॉ विजयकुमार गावित (कॅबिनेट मंत्री आदिवासी विकास मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र) विशेष अतिथी प्राद्यापक डॉ. मधुकर पाडवी (कुलगुरू बिरसा मुंडा जनजाति केंद्रीय विश्वविद्यालय, राजपीपला गुजरात), प्रमुख वक्ता श्री वैभव सुरंगे (प्रसिद्ध समाजसेवी, नवी दिल्ली), विशेष वक्ता श्री आर एस मिश्रा (अनुसंधान अधिकारी राष्ट्रीय अनुसूचित जनजाति आयोग नवी दिल्ली) प्रमुख उपस्थिती प्राद्यापक श्री सोपान इंगळे व श्री प्रकाश टारपे, डॉ विनोद पाटील (रजिस्ट्रार कबचौ जळगाव), प्राद्यापक सुनील कुलकर्णी (संचालक विद्यार्थी विकास कबचौ जळगाव) संमेलनला उपस्थित होते. या पोस्टर सादरीकरण स्पर्धेत एकूण १५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

या पोस्टर सादरीकरण स्पर्धेत आर. सी. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मस्युटिकल एज्यूकेशन अँड रिसर्च शिरपूर येथील प्रिती गावित, रोशनी पावरा, विनायक पावरा व भुपेंद्र वळवी या विद्यार्थानीं सहभाग नोंदविला होता, त्यात त्यांना तृतीय पारितोषिक मिळाले. त्यासाठी या विद्यार्थांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सुराणा, उप प्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर, विद्यार्थी विकास विभाग प्रमुख डॉ. विनोद उगले व प्राद्यापक राहुल पावरा यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष मा. आ. श्री. अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष श्री. भूपेशाभाई पटेल, तसेच उपाध्यक्ष श्री. राजगोपालजी भंडारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सुराणा, उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर, प्राचार्य डॉ. नितिन हासवानी यांनी या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व शुभेछया दिल्या






लोकमत

# विद्यापीठस्तरीय पोस्टर स्पर्धेत पटेल फार्मसी तृतीय

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर** : उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथील राष्ट्रीय पोस्टर सादरीकरण स्पर्धेत शहरातील आर.सी. पटेल फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी तृतीय पारितोषिक प्राप्त केले.

राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग नवी दिल्ली व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यता संग्रामात आदिवासी नायकांचे योगदान या विषयावर आदिवासी विद्यार्थी संमेलन व पोस्टर सादरीकरण स्पर्धा आयोजित केली होती. या कार्यक्रमाला आदिवासी विकासमंत्री डॉ. विजयकुमार गावित, कुलगुरू डॉ. व्ही.एल. माहेश्वरी, डॉ. मधुकर पाडवी (गुजरात), वैभव सुरंगे (नवी दिल्ली), आर.एस. मिश्रा (नवी दिल्ली), प्रा. सोपान इंगळे, प्रकाश टारपे, डॉ. विनोद पाटील प्रा. सुनील कुलकर्णी संमेलनाला उपस्थित होते.

या पोस्टर सादरीकरण स्पर्धेत १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यात आर.सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च येथील प्रीती गावित, रोशनी पावरा, विनायक पावरा व भूपेंद्र वळवी या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून तृतीय पारितोषिक मिळविले. त्यासाठी या विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. संजय सुराणा, उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर, विद्यार्थी विकास विभागप्रमुख डॉ. विनोद उगले, प्रा. राहुल पावरा यांचे मार्गदर्शन लाभले.संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरीशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, प्राचार्य डॉ. संजय सुराणा, उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर, प्राचार्य डॉ. नितीन हासवानी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

Hello Dhule
Page No. 3 Oct 16, 2022
Powered by: erelego.com

जळगाव तरुण भारत

Main Edition | 2022-10-15 | Page- 7
epaper.tarunbharatjalgaon.com

# राष्ट्रीय पोस्टर सादरीकरण स्पर्धेत आर. सी. पटेल फार्मसीच्या विद्यार्थांना तृतीय पारितोषिक



**शिरपूर** : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील राष्ट्रीय पोस्टर सादरीकरण स्पर्धेत आर. सी. पटेल फार्मसीच्या विद्यार्थांनी तृतीय पारितोषिक प्राप्त केले. ८ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग नवी दिल्ली व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वातंत्र्यता संग्रामात आदिवासी नायकांचे योगदान' या विषयावर आदिवासी विद्यार्थी संमेलन व पोस्टर सादरीकरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी आदिवासी विकास मंत्री ना. डॉ. विजयकुमार गावित उपस्थित होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. व्ही. एल. माहेश्वरी होते. विशेष अतिथी प्रा. डॉ. मधुकर पाडवी (कुलगुरू बिरसा मुंडा जनजाति केंद्रीय विश्वविद्यालय, राजपिपला गुजरात), प्रमुख वक्ता वैभव सुरंगे (प्रसिद्ध समाजसेवी, नवी दिल्ली), विशेष वक्ता आर. एस. मिश्रा (अनुसंधान अधिकारी राष्ट्रीय अनुसूचित जनजाति आयोग नवी दिल्ली), प्रा. सोपान इंगळे, प्रकाश टारपे, डॉ. विनोद पाटील (रजिस्ट्रार कबचौ जळगाव), प्रा. सुनील कुलकर्णी (संचालक विद्यार्थी विकास कबचौ जळगाव) संमेलनला उपस्थित होते. या पोस्टर सादरीकरण स्पर्धेत एकूण १५0 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. यात आर. सी. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मस्युटिकल एज्यूकेशन अँड रिसर्च शिरपूर येथील प्रिती गावीत, रोशनी पावरा, विनायक पावरा व भूपेंद्र वळवी या विद्यार्थांनी सहभाग नोंदवून तृतीय पारितोषिक मिळविले. त्यासाठी या विद्यार्थांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सुराणा, उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर, विद्यार्थी विकास विभाग प्रमुख डॉ. विनोद उगले, प्रा. राहुल पावरा यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आ. अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशाभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, प्राचार्य डॉ. संजय सुराणा, उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर, प्राचार्य डॉ. नितिन हासवानी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


D-11

स्वतंत्रता संग्राम में जनजाति नायकों का योगदान

सत्यमेव जयते

आज़ादी का अमृत महोत्सव

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

National Commission for Scheduled Tribes, New Delhi &
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
Department of Student Development
organized under the joint aegis of
"Contribution of Tribal Heroes in Freedom Struggle" Tribes Student Conference.
08 October 2022

Certificate

This is certify that Mr / Ms / Mrs Pawara Roshni Ravindra of R.C. Patel I.O. Pharmacy, Shirpur has participated and presented poster entitled ........ under the category UG / PG / Post-PG in the conference of *"Contribution of Tribal Heroes in Freedom Struggle"* organized by National Commission for Scheduled Tribe, New Delhi and Department of Student Development Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon on 8th October 2022.

Prof. Sunil Kulkarni
Director
Department of Student Development,
KBCNMU, Jalgaon

Dr. Vinod Patil
Registrar
KBCNMU, Jalgaon

Prof. S.T. Ingle
Pro-Vice Chancellor
KBCNMU, Jalgaon


D-13

स्वतंत्रता संग्राम में जनजाति नायकों का योगदान

सत्यमेव जयते

आज़ादी का अमृत महोत्सव

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

National Commission for Scheduled Tribes, New Delhi &
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
Department of Student Development
organized under the joint aegis of
"Contribution of Tribal Heroes in Freedom Struggle" Tribes Student Conference.
08 October 2022

Certificate

This is certify that Mr / Ms / Mrs Gavit Priti Kothya of R.C. Patel I.O. Pharmacy, Shirpur has participated and presented poster entitled ........ under the category UG / PG / Post-PG in the conference of *"Contribution of Tribal Heroes in Freedom Struggle"* organized by National Commission for Scheduled Tribe, New Delhi and Department of Student Development Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon on 8th October 2022.

Prof. Sunil Kulkarni
Director
Department of Student Development,
KBCNMU, Jalgaon

Dr. Vinod Patil
Registrar
KBCNMU, Jalgaon

Prof. S.T. Ingle
Pro-Vice Chancellor
KBCNMU, Jalgaon

| उपक्रम ७. | 'वाचन प्रेरणा दिन' |
|---|---|

आर.सी. पटेल फार्मसी महाविद्यालयात दि. १५ ऑक्टोंबर २०२२ रोजी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवशी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. तरुणांमध्ये पुस्तके वाचनाची सवय वाढवण्यासाठी कल्पना आणि कार्यक्रम विकसित करावे या साठी ग्रंथालय विभाग तर्फे ग्रंथालयाचे प्रमुख नितीन माळी यांनी विविध पुस्तकाचे प्रदर्शन आयोजित केले होते. या पुस्तक प्रदर्शनाचे उदघाटन शिरपूर पीपल्स बँकेचे चेअरमन योगेश भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले. या निमित्त योगेशभाऊ भंडारी यांनी भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सुराणा, उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर, डॉ.सी.आर. पाटील, डॉ.एच.एस. महाजन, डॉ.एस. एस. चालिकवार, डॉ. अनिल टाटिया, डॉ.पी.पी. नेरकर, डॉ. आशिष गोरले, प्रा.डॉ.एस.डी. पाटील, आर.सी. पटेल पॉलीटेक्नीक चे प्राचार्य डॉ. नवीन हासवानी, आर. सी. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ. नितीन हासवानी, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार जितेश जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. मनोज गिरासे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विनोद उगले, गंथालयाचे कर्मचारी प्रवीण ईशी, गुड्ड्या पावरा, मनोजकुमार शिरसाठ, जितेंद्र शिरसाठ, सुनील कोळी व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.


GPS Map Camera
Shirpur, Maharashtra, India
Shop No 1 Karwand Naka, near Pharmacy Collage, Mandal, Shirpur,
Maharashtra 425405, India
Lat 21.355483°
Long 74.894429°
15/10/22 12:52 PM
Google
Do not spit

दैनिक वार्ता

# आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा




शिरपूर – आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवशी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. तरुणांमध्ये पुस्तके वाचनाची सवय वाढवण्यासाठी कल्पना आणि कार्यक्रम विकसित करावे या साठी ग्रंथालय विभाग तर्फे ग्रंथालयाचे प्रमुख नितीन माळी यांनी विविध पुस्तकाचे प्रदर्शन आयोजित केले होते. या पुस्तक प्रदर्शनाचे उदघाटन शिरपूर पीपल्स बँकेचे चेअरमन योगेश भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले. या निमित्त योगेशभाऊ भंडारी यांनी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सुराणा, उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर, डॉ. सी. आर. पाटील, डॉ. एच. एस. महाजन, डॉ. एस. एस. चालिकवार, डॉ. अनिल टाटिया, डॉ. पी. पी. नेरकर, डॉ. आशिष गोरले, प्रा. डॉ. सौ. एस डी पाटील, आर. सी. पटेल पॉलीटेक्नीक चे प्राचार्य डॉ. नवीन हासवानी, आर. सी. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ. नितीन हासवानी, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार जितेश जाधव उपस्थित होते.कार्यक्रमाला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. मनोज गिरासे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विनोद उगले, गंथालयाचे कर्मचारी प्रवीण ईशी, गुड्ड्या पावरा, मनोजकुमार शिरसाठ, जितेंद्र शिरसाठ, सुनील कोळी व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.




# पटेल फार्मसी महाविद्यालयात वाचन प्रेरणादिन

**शिरपूर, दि.२४– आर.सी. पटेल फार्मसी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.**

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवशी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. तरुणांमध्ये पुस्तके वाचनाची सवय वाढवण्यासाठी कल्पना आणि कार्यक्रम विकसित करावे या साठी ग्रंथालय विभाग तर्फे ग्रंथालयाचे प्रमुख नितीन माळी यांनी विविध पुस्तकाचे प्रदर्शन आयोजित केले होते. या पुस्तक प्रदर्शनाचे उदघाटन शिरपूर पीपल्स बँकेचे चेअरमन योगेश भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले. या निमित्त योगेशभाऊ भंडारी यांनी भारतरतक डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय सुराणा, उपप्राचार्य डॉ.अतुल शिरखेडकर, डॉ.सी.आर. पाटील, डॉ.एच.एस. महाजन, डॉ.एस. एस. चालिकवार, डॉ.अनिल टाटिया, डॉ.पी.पी. नेरकर, डॉ.आशिष गोरले, प्रा.डॉ.एस.डी. पाटील, आर.सी. पटेल पॉलीटेक्नीक चे प्राचार्य डॉ. नवीन हासवानी, आर. सी. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ.नितीन हासवानी, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार जितेश जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ.मनोज गिरासे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.विनोद उगले, गंथालयाचे कर्मचारी प्रवीण ईशी, गुड्ड्या पावरा, मनोजकुमार शिरसाठ, जितेंद्र शिरसाठ, सुनील कोळी व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

| उपक्रम ८. | 'स्वतंत्र आणि सशक्त भारताच्या पायाभरणीत शास्त्रज्ञांचे योगदान या विषयावर व्याख्यान' |
| --- | --- |

कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव आणि आर सी पटेल फार्मसी' यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित ७५ व्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त स्वतंत्र आणि सशक्त भारताच्या पायाभरणीत शास्त्रज्ञांचे योगदान या विषयावर १२ नोव्हेंबर २०२२ ला व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमा साठी विद्यापीठाकडून अनुदान प्राप्त झाले आहे.

या प्रसंगी डॉ डी. आर. पाटील हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सुराणा, उपप्राचार्य डॉ अतुल शिरखेडकर, आर सी पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. नितीन हसवानी, डॉ हितेंद्र महाजन, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ विनोद उगले, राष्ट्रीय सेवा योजने चे अधिकारी डॉ मनोज गिरासे, सहायक अधिकारी प्रा आमोद पाटील आदी उपस्थित होते. या व्याख्यानाला १२० विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली.

प्राचार्य डॉ डी. आर. पाटील यांनी स्वतंत्र व सशक्त भारताच्या पायाभरणीत शास्त्रज्ञांचे योगदान या विषयावर मार्गदर्शन केले त्यांनी स्वतंत्र पूर्व काळातील शास्त्रज्ञांचे मोलाचे कार्य व त्यांनी लावलेले शोध तसेच त्या शोधाचा पुढील काळामध्ये असलेला उपयोगिता या संदर्भात माहिती दिली तसेच स्वातंत्र्योत्तर काळात शास्त्रज्ञांचे मोलाचे योगदान यामुळे आपला देश आज टेक्नॉलॉजीच्या जोरावर आपले उंच व मजबूत स्थान निर्माण करू शकला.

त्यांनी आपल्या भाषणामध्ये हरित क्रांतीचे जनक **डॉ एम.एस. स्वामिनाथन** यांनी आपल्या देशाला दुष्काळातून बाहेर काढण्यात आणि शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. डॉ स्वामीनाथन यांची भारतातील महान कृषी शास्त्रज्ञ म्हणून गणना केली जाते आणि त्यांच्या प्रयत्नांमुळे साठच्या दशकात भारतात हरित क्रांती यशस्वी झाली. म्हणूनच स्वामीनाथन यांना हरितक्रांतीचे जनक मानले जाते. भारताच्या स्वातंत्र्यानंतर, अर्थव्यवस्था मजबूत करण्याचा आणि लोकांना सशक्त करण्याचा सर्वात मोठा आणि प्रभावी मार्ग म्हणजे

शेतकऱ्यांना चांगले आणि जास्तीत जास्त उत्पादन मिळाले पाहिजे. हाच हेतू डोळयासमोर ठेवून डॉ स्वामीनाथन यांनी आपली वाटचाल सुरु केली, याबद्दल माहिती दिली.

**डॉ. वर्गीस कुरियन** मिल्क मॅन ऑफ इंडिया' श्वेत क्रांतीचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या यांनी केलेले  रेवोल्युशन याबद्दल सविस्तर माहिती दिली तसेच डीआरडीचेस कॉन्ट्रीब्युशन याबद्दल माहिती दिली

**डॉ. कलाम** यांचे चरित्र अभ्यासल्यास युवकांना जगण्याची नवी दिशा मिळेल, असे मत डॉक्टर अब्दुल कलाम यांचे मिसाईल टेक्नॉलॉजी असलेले योगदानाच्या जोरावर विविध आणि इंटर कॉन्टिनेन्टल मिसाईल भारताने निर्माण केल्या.

आज आपला देश जेनेरिक औषधीच्या क्षेत्रामध्ये जगाचं नेतृत्व करत आहेत तसेच आरोग्याच्या संदर्भात असलेल्या टेक्नॉलॉजी मध्ये अग्रेसर देशांमध्ये स्थान प्राप्त केले आहे

**डॉक्टर होमी जहांगीर भाभा**: इ.स. १९४० साली भारतात परत आल्यावर काही काळ डॉ. भाभा यांनी भारतीय विज्ञान संस्था, बंगलोर येथे प्रोफेसर म्हणून काम केले. इ.स. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात मदत केली भारताच्या स्वातंत्र्यानंतर इ.स. १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने अणु उर्जा आयोगाची स्थापना करण्यात आली. याही संस्थेचे ते संचालक म्हणून काम पाहू लागले. त्यांच्या अथक परिश्रमांमुळेच भारत देशात अणु भट्टीची स्थापना होऊ शकली. डॉ. होमी भाभा यांनी पाया रचला म्हणूनच भारताने अनेक ठिकाणी अणु भट्या सुरू करून त्यांचा विज निर्मितीसाठी उपयोग केला. तसेच १८ मे, इ.स. १९७४ या दिवशी भारताने पोखरण येथे पहिला अणुस्फोट घडवून आणला.

**डॉक्टर विक्रम साराभाई** त्यांनी ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबाद येथे भौतिकी संशोधन कार्यशाळेची स्थापना केली. १९७५ मध्ये जो पहिला अंतरिक्ष उपग्रह आर्यभट्ट अवकाशात सोडला गेला त्याची रचना विक्रम साराभाई यांच्या अहमदाबाद रिसर्च सेंटर मध्येच केली होती. विक्रम साराभाई यांनी जागतिक कीर्ती असलेल्या अनेक सस्थांची सुरुवात केली. इंडियन इन्स्टिट्यूट

ऑफ मॅनेजमेन्ट (IIM) राष्ट्रीय भौतिकी प्रयोगशाळा (PRL) अहमदाबाद येथे वस्त्रोद्योग निर्मितीस चालना देणारे अहमदाबाद टेक्स्टाईल इंडस्ट्रीयल रिसर्च असोसिएशन (ATIRA) या संस्थेची उभारणी त्यांनी केली. पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असलेली सेंटर फॅार इन्व्हीरॅान्मेंटल प्लॅनिंग टेक्नॅालॅाजी (CEPT) ही संस्था देखील त्यांनी उभारली. अश्या विविध संशोधकांच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात आला.

तसेच **डॉ रंगनाथन** यांची सुसंस्कृत समाजनिर्मितीसाठी शालेय शिक्षणासोबतच निरंतर शिक्षणदेखील किती आवश्यक असते, याची महत्त्व डॉ. रंगनाथन् यांनी सर्वप्रथम पटवून दिले. त्याकरिता ग्रंथालयांचा विकास, वाचनसंस्कृती रुजवण्यासाठी जनतेला प्रवृत्त केले पाहिजे, हा विचार डॉ. रंगनाथन् यांनीच सर्वप्रथम देशात रुजवला. आधुनिक भारतातील ग्रंथालयांच्या विकासात डॉ. रंगनाथन् ह्यांचा फार मोठा वाटा आहे. डॉ. रंगनाथन् ह्यांचा वाढदिवस भारतात 'ग्रंथपाल दिन' म्हणून साजरा केला जातो.

